पृष्ठ क्रमांक: 1

पृष्ठ क्रमांक: 2

पृष्ठ क्रमांक: 3

We don't wish To be The BIGGEST
But we try to the BEST
IDEAL TRADERS
Jio PRIME RETAILER
Go Green, Say no to PLASTIC!
SCHOOL BOOKS, OFFICE & COMPUTER STATIONARY
1-Kumar Corner, Opp. Post Office,
DAHANU ROAD,Dist : Palghar. Pin. 401602
Email : idealdahanu@gmail.com Ph : 02528-222996, Cell : 9226770000

शासनमान्य जाहिरात यादीत समाविष्ट दैनिक वर्तमानपत्र!
राजतंत्र

INDUSTRY 4 HER
पालघर जिल्ह्यातील प्रत्येक गावात
महिलांसाठी ईएसडीएम उद्योग
www.industry4her.com

| वर्ष १८ | अंक १९१ | मंगळवार दि. १६ जुलै २०१९ | दैनिक | किंमत १ रुपया | पृष्ठे ४ | पालघर | संपादक : संजीव जोशी | RNI NO. MAH/MAR/2002/08765

बोईसर येथे गुरे चोरणारी टोळी सक्रिय!

बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करुन काढला पळ

राजतंत्र, वार्ताहर
बोईसर । दि. १५

बोईसर पूर्वेला असलेल्या बेटेगाव हद्दीतील कृष्णा विनायक कंपनी जवळ आणि बोईसर चिल्हार रस्त्यावरील नागझरी चौकात मध्यरात्री चारचाकी वाहनातून गुरे चोरण्यासाठी आलेले चोरटे आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांमध्ये थरारनाट्य घडले. मोकाट गुरे चोरण्याच्या हेतूने आलेल्या या टोळीचा विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पाठलाग केल्याने चोरटे गुरे रस्त्यातच सोडून फरार झाले. मात्र या घटनेत चोरट्यांकडून झालेल्या हल्ल्यात दोघे जखमी झाले आहेत.

बोईसर-चिल्हार रस्त्यावरील जनावरांना गुंगीचे इंजेक्शन देऊन बेशुद्ध करून त्यांना चारचाकी वाहनातून पळवून नेणारी टोळी सध्या बोईसर पूर्व भागात सक्रिय झाली असून, बोईसर - चिल्हार रस्त्यावर अनेक ठिकाणी येथील शेतकऱ्यांची मोकाट जनावरे रात्रीच्या सुमारास विश्रांतीसाठी बसतात. हीच संधी साधून रविवारी मध्यरात्री चारचाकी वाहनातून आलेल्या चोरट्यांनी बेटेगाव येथील कृष्णा विनायक कंपनीजवळ बसलेल्या मोकाट गुरांना गाडीत भरण्याचा प्रयत्न केला. मात्र रात्री गस्तीवर असलेल्या बजरंग दलाच्या काही कार्यकर्त्यांनी हा प्रकार पाहिल्यानंतर त्यांनी या चोरट्यांना हटकले. यावेळी गुरे तिथेच सोडून चोरट्यांनी वाहनासह धूम ठोकली. त्यामुळे बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा पाठलाग केला, मात्र त्यावेळी त्यांच्या पाठीमागून अचानक चोरट्यांच्या दुसऱ्या एका वाहनातून दगडफेक करण्यात आली. यामध्ये दोन कार्यकर्ते जखमी झाले तर वाहनाचे मोठे नुकसान झाले.

याप्रकरणी बोईसर पोलीस स्टेशनमध्ये बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेचे नारायण खडी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात गुरे चोरणाऱ्या चोरट्यांविरोधात तक्रार नोंदवण्यात आली आहे.

दरम्यान, गुरांना चरण्यासाठी जागाच शिल्लक राहिली नसल्याने या भागातील शेतकरी गुरे मोकाट सोडून देत आहेत. या भागातील पशुधन वाचविण्यासाठी ठोस उपाययोजना शासनाकडून करण्यात याव्या, अशी मागणी शेतकरी करीत आहेत. तर बोईसर चिल्हार रस्त्यावर भुरट्या चोऱ्या, मोकाट गुरे (पशुधन) चोरीच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामागे मोठ्या टोळ्या सक्रिय झाल्याचे दिसते.

त्यामुळे बोईसर व मनोर पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून या चोरांचा बंदोबस्त करावा, जेणेकरून पुन्हा-पुन्हा या घटना घडणार नाहीत, अशी अपेक्षा परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहे.

धारावीत नाल्यात पडून मुलाचा मृत्यू

राजतंत्र, वृत्तसंस्था
मुंबई । दि. १५

शहरात उघड्या गटारांमध्ये, नाल्यांमध्ये पडून मृत्यू होण्याच्या घटना वाढत आहेत. आज धारावी परिसरातील एका नाल्यात पडून एका ७ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. सुमीत मुत्रा जैसवार असे या मुलाचे नाव आहे.

धारावीत क्र. १ उद्यानाजवळील राजीव गांधी कॉलनीत पिवळा बंगला परिसरात हा नाला आहे. आज दुपारी ३ च्या सुमारास हा मुलगा त्या नाल्यात पडून बुडू लागला. स्थानिक पोलिसांनी त्याची सुटका केली आणि त्याला शीव रुग्णालयात दाखल केले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

यापूर्वी गेल्या शनिवारपासून सातत्याने मुलं नाल्यात पडण्याच्या घटना मुंबईत घडल्या आहेत.

दलित ठेकेदाराला बिल्डरची जातीवाचक शिवीगाळ!

अॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल

राजतंत्र, प्रतिनिधी
वाडा । दि. १५

जिवे मारण्याची धमकी...!

तालुक्यातील कुपरी येथील संजोग सुरेश पाटील या बिल्डरने आपल्याकडे ठेकेदार म्हणून काम करणाऱ्या दिनेश उर्फ दिलीप आहिरे यांनी कामाचे उर्वरित पैसे मागितले म्हणून फोन करून जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याने परिसरात खळबळ माजली असून आरोपी संजोग विरुद्ध वाडा पोलिस स्टेशनमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक (अॅट्रॉसिटी) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठेकेदार आहिरे हे मुळचे नाशिक जिल्ह्यातील सटाणा येथील असून रोजगाराच्या निमित्ताने ते वाडा तालुक्यातील कुडुस येथे गेल्या अनेक वर्षांपासून राहतात. बिल्डर संजोग पाटील यांच्या इमारतीच्या बांधकामांवर ते नियमितपणे सेंट्रींगचे काम ठेकेदार पध्दतीने करत आहेत.

आपल्या कामाच्या मजुरीपैकी राहिलेल्या ४५ हजार ८०० रुपयांची मागणी केल्याने संतापलेल्या बिल्डर संजोग पाटील यांनी त्यांना मोबाईलवर फोन करून जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. या धमकीने घाबरलेल्या आहिरे कुटुंबीयांनी वाडा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली असून आरोपी संजोग पाटील याच्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणी उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत सोनावणे अधिक तपास करीत आहेत.

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त उत्कृष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा सत्कार

वळवंडाच्या बॉस्को सामाजिक विकास संस्थेला यावेळी प्रथम पारितोषिक

राजतंत्र न्यूज नेटवर्क
पालघर । दि. १५

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. अशाच प्रकारे लायन्स क्लब ऑफ पालघर येथे सोमवारी आयोजित एका कार्यक्रमात जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षणाचे उत्कृष्ट काम केलेल्या संस्थांचा विभागाच्या वतीने चषक आणि प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

आदिवासी उमेदवारांना दुचाकी आणि चारचाकी वाहनांची देखभाल दुरुस्ती तसेच इलेक्ट्रिशियन, आर्क अॅण्ड गॅस वेल्डरचे निवासी प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या जव्हार तालुक्यातील वळवंडाच्या बॉस्को सामाजिक विकास संस्थेला यावेळी प्रथम पारितोषिक देण्यात आले.

तसेच आदिवासी महिलांना गारमेंट क्षेत्रातील टेलरिंगचे प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या डहाणू तालुक्यातील कासा येथील स्वानंद इंटरप्राईझेसला द्वितीय पारितोषिक, टॅली व वेब डिझायनिंगचे प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या कमाईच्या कृषी कॉम्प्युटर एज्युकेशन या संस्थेस तृतीय तर सीएसआर अंतर्गत आदिवासी उमेदवारांना सीएनसी मिलिंग व आर्क अॅण्ड गॅस वेल्डरचे प्रशिक्षण देणाऱ्या डहाणूतील आच्छाडच्या टेमा इंडिया लि. या संस्थेस उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

या कार्यक्रमास पालघर तालुका इंडस्ट्रीयल असोसिएशनचे उपाध्यक्ष जितुभाई गांधी, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता अधिकारी मुकेश संखे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी ब्रिजकिशोर झंवर, [illegible] प्रतिनिधी संजयसिंग ठाकूर, नीता चौरे, कौशल्य विकास विभागातील प्रकाश वाघ, संतोष वाघ, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक साहिर पेडकर तसेच पालघर जिल्ह्यामध्ये कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणाऱ्या विविध संस्थांचे व्यवस्थापक व त्या संस्थेमध्ये प्रशिक्षणाचा लाभ घेतलेले विद्यार्थी उपस्थित होते.

संखे यांनी प्रास्ताविकाद्वारे जिल्ह्यात कौशल्य विकास विभाग करीत असलेले काम, कौशल्य विकास प्रशिक्षणाचे महत्व आणि तरुणांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी संधी असलेल्या विविध क्षेत्रांविषयी माहिती दिली. गांधी यांनी उद्योग क्षेत्रातील अनुभव आणि उद्योजक होण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य कसे विकसित करावे, याबाबत मार्गदर्शन केले. तर झंवर यांनी कौशल्य विकासाचे महत्व पटवून देताना कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी मेहनत आवश्यक असल्याचे सांगितले.

पारितोषिक प्राप्त संस्थांचे संचालक तसेच विविध संस्थांमधून प्रशिक्षण घेतल्यानंतर रोजगार मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

शासनामार्फत देण्यात येणाऱ्या मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे रोजगार मिळाल्याने कुटुंबाला आधार आणि आयुष्याला दिशा मिळाल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

शिवसेना कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी! -प्रकाश पाटील

राजतंत्र, प्रतिनिधी
वाडा । दि. १४

शिव सेना
वाडा तालुका
कार्यकर्ता मेळावा

शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची भूमिका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कायम सांगितली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी शिवसेना कायम भक्कमपणे उभी असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे ठाणे जिल्हा

शेतकऱ्यांसाठी असलेल्या मोर्चा संदर्भात उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यासोबत शिवसेना महिला आघाडीच्या जालना व हिंगोली लोकसभा संपर्क संघटक पदी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा मेळाव्यात सत्कार करण्यात

जिल्हा सह समन्वयक गोविंद पाटील, तालुका प्रमुख उमेश पठारे, तालुका समन्वयक प्रकाश केणे, नगराध्यक्षा गितांजली कोलेकर, पंचायत समिती सदस्य अरुण अधिकारी, स्नेहा जाधव, माजी तालुका प्रमुख प्रकाश पाटील, वाडा शहर प्रमुख नरेश चौधरी, जेष्ठ कार्यकर्ते धनंजय पष्टे, महिला आघाडीच्या जिल्हा उप संघटक

Start Believing, Start Dreaming,
Start Planning & Achieving
Give Meaning to Education
- आपल्या मुलांना करिअरच्या स्पर्धेत भरकटू देऊ नका.
- आवडीनिवडी आणि क्षमतेनुसार त्यांच्यासमोर पर्याय उपलब्ध करा
- करिअरच्या हजारो संधीमधून योग्य संधी निवडण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा.
योग्य करिअरची निवड करण्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या

PDFmyURL easily turns web pages and even entire websites into PDF!
PDFmyURL

पृष्ठ क्रमांक: 4

केले.

माझा महाराष्ट्र, भगवा महाराष्ट्र

मेळावा वाड्यातील पी. जे. हायस्कूलच्या सभागृहात रविवार

करण्यात आला होता. या मेळाव्यात नवीन शाखाप्रमुख

व शेतकरी पिक विमा योजना व १७ जुलै रोजी मुंबई येथे

या मेळाव्यास भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे, पालघर

संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजच संपर्क साधा
अजय भगत
ajaybhagat8914@gmail.com | 9987564702

दांडेकर महाविद्यालयात रंगणार स्टॅन्ड अप कॉमेडी स्पर्धा!

पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजन

राजतंत्र, प्रतिनिधी
पालघर। दि. १५

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांतर्गत पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यावर आधारित स्टँड अप कॉमेडी स्पर्धेचे आयोजन राज्यात केले जाणार आहे. पालघर केंद्रासाठीची स्पर्धा पालघरमधील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात गुरुवार, १८ जुलै रोजी होणार आहे.सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रावर पात्र ठरणाऱ्या निवडक विजेत्यांना स्पर्धेच्या अंतिम फेरीत सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातील विनोदी कलावंतांचे टॅलेंट हंट करण्याचा प्रयत्न या स्पर्धेच्या निमित्ताने राज्य शासन करणार आहे. लवकरच या स्पर्धेच्या जिल्हास्तरीय फेऱ्यांना सुरुवात होणार असून, प्रत्येक केंद्रावरील विजेत्याला २० हजार रुपये आणि उपविजेत्याला १५ हजार रुपये अशी रोख स्वरूपाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक केंद्रावर सकाळी १० ते दुपारी २ आणि दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत स्पर्धेचे आयोजन होणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी ७५०६६४८०५५ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर २ मिनिटांचे सादरीकरण चित्रित करून १७ जुलैपर्यंत पाठवायचे आहे. यातून निवड करण्यात आलेल्या स्पर्धकाला सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या केंद्रावर ७ ते ८ मिनिटे सादरीकरण करावयाचे आहे.

KONNECT IT
THE COMPUTER SHOP
BAJAJ FINSERV
बजाज फायनान्स उपलब्ध आहे
SPECIALISED IN LAPTOP REPAIRING
BUY ANY HP NOTEBOOK OR DESKTOP & GET FABULOUS OFFER !!
BUY BRAND BUY
9226289000 / 9226388754
AG - 18, Annapurna Park, Behind Hotel Chandrika

Copyright © All Rights Reserved. This ePaper Pro v2.0 is Licensed to RAJTANTRA, Marathi Daily Newspaper.

Counter

RDestWeb

PDFmyURL easily turns web pages and even entire websites into PDF!

PDFmyURL